# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:18.06.2025** **वार:बुधवार**

---

1. जी 7 परिषदेमध्ये दहशतवादाला प्रोत्साहन आणि पाठिंबा देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची गरज पंतप्रधानकडून अधोरेखित
2. महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाला मंजुरी
3. इराणला बिनशर्त शरणागती पत्करण्याचा अमेरिकेचा इशारा आणि
4. तिरंदाजीच्या आशिया करंडक दुसऱ्या टप्प्यात वैयक्तिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंची अंतिम फेरीत धडक

**<u>पंतप्रधान-कॅनडा</u>**

कॅनडामधील कनानास्किस इथं झालेल्या जी-7 संपर्क शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जी-7 नेत्यांसोबत प्रमुख जागतिक आव्हानं आणि सामायिक आकांक्षांवर फलदायक चर्चा केली. बदलत्या जगातील सहभाग आणि परवडेल अशी क्षमता यांची खात्री करण्यासाठी ऊर्जा सुरक्षितता, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि गुंतवणूकीच्या भविष्यावरील जी-7 चर्चेत त्यांनी भाग घेतला. आपल्या भाषणात, पंतप्रधानांनी शाश्वत आणि हरित मार्गानं सर्वांसाठी ऊर्जा सुरक्षिततेची खात्री करण्याची गरज अधोरेखित केली आणि या उद्देशासाठी आंतरराष्ट्रीय सौर आघाडी, आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधा परिषद आणि जागतिक जैवइंधन आघाडी यासारख्या भारताच्या जागतिक उपक्रमांवर सविस्तर चर्चा केली. विकसनशील देशांच्या चिंता आणि प्राधान्यांकडे लक्ष वेधून त्यांनी नमूद केलं की भारतानं या देशांचा आवाज जागतिक व्यासपीठावर पोहोचवण्याची जबाबदारी घेतली आहे. जी-7 शिखर परिषदेत पंतप्रधानांचा हा सलग सहावा सहभाग होता. भारत आणि कॅनडादरम्यान गुंतवणुकीबद्दल यावेळी बोलताना पंतप्रधान म्हणाले...

**कनाडा की अनेक कंपनियों का भारत में निवेश है। भारत के लोगों का भी कनाडा की धरती पर बहुत बड़ा निवेश है। लोकतांत्रिक मूल्यों को समर्पित कनाडा और भारत मिलकर के लोकतंत्र को मजबूत करना होगा। मानवता को मजबूत करना होगा। हमारे रिसोर्सेज का ऑप्टिमम यूटिलाइजेशन करकर मानव जाति के कल्याण के काम में कैसे ला सकते हैं, उस दिशा में हम प्रयास करते रहेंगे।**

आपल्या दौऱ्याच्या पुढील भागात पंतप्रधान क्रोएशियाला रवाना झाले आहेत.

**<u>11वर्षे</u>**

गेल्या अकरा वर्षात केंद्र सरकारनं सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांनुसार काम करत देशात उल्लेखनीय परिवर्तन घडवून आणलं आहे. पायाभूत सेवा, शिक्षण, हरित ऊर्जा यासारख्या विविध क्षेत्रांबरोबरच आरोग्य क्षेत्रातही लक्षणीय परिवर्तन झालं आहे. आयुष्मान भारत योजनेचा लाभ जवळजवळ 55 कोटी लोकांना मिळत आहे. तर आयुष्मान वय वंदना योजनेअंतर्गत, 70 वर्षे आणि त्यावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य विम्याचा लाभ देण्यात येत आहे. आयुष्मान भारत डिजिटल मिशनच्या माध्यमातून आधुनिक पद्धतीनं आरोग्यसेवा पुरवली जात आहे, 78 कोटींहून अधिक आयुष्मान भारत आरोग्य खाती तयार करण्यात आली आहेत. आरोग्याशी संबंधित पायाभूत सुविधांची उभारणी झाल्यामुळे आरोग्य सेवेचा विस्तार झाला आहे.

ईशान्येकडच्या राज्यांमध्ये एम्स रुग्णालयांची स्थापना करण्यात आली आहे. कोविडच्या जागतिक संकटातही भारताने टाळेबंदी, कृती दलाची स्थापना, लस निर्मिती अशा विविध पातळ्यांवर लक्षणीय काम केलं आहे.

**<u>महाॲग्री-एआय</u>**

महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण 2025 ते 2029 ला राज्य मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. यामुळे कृषि क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून परिवर्तन घडवता येईल. कृत्रिम बुद्धीमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धीमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टीक्षमता, रोबोटिक्स, पूर्वानुमान विश्लेषण यांचा वापर करत, राज्यातले ॲग्रीस्टेक, महा-ॲग्रीस्टेक, महावेद, क्रॉपसॅप, ॲगमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डिबीटी यांसारखे प्रकल्प पुढं न्यायला मदत होणार आहे.

काल झालेल्या बैठकीत इतरही महत्वाचे निर्णय मंत्रिमंडळानं घेतले. त्यानुसार केंद्र सरकारच्या WINDS, म्हणजे हवामान माहिती नेटवर्क डेटा यंत्रणा या प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रं उभारली जाणार आहेत. यासाठी महावेध प्रकल्पाला मुदतवाढ द्यायचा निर्णय यावेळी झाला. आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुप्पटीनं वाढ करण्याचा तसंच हयात जोडीदारालाही मानधन देण्याचा निर्णयही या बैठकीत झाला.

राज्यातील विविध भागात मोसमी पावसाने हजेरी लावल्याने आतापर्यंत सुमारे साडे अकरा लाख हेक्टर शेतजमीनीवर पेरण्या झाल्या असल्याची माहिती राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. राज्यातील सर्व धरणांच्या पाणीसाठ्यात चांगली वाढ होत असल्याचं देखील यावेळी सांगण्यात आलं.

**<u>इराण-इस्रायल</u>**

इराण आणि इस्रायल दरम्यान पुन्हा एकदा झालेल्या हवाई हल्ल्यादरम्यान, इराणच्या अणुकेंद्राला लक्ष्य केल्याची पुष्टी आंतरराष्ट्रीय अणुउर्जा आयोगाने केली आहे. इस्रायलने इराणच्या आकाशक्षेत्रावर पूर्ण ताबा मिळवल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. तेल अवीवमधील प्रमुख गुप्तचर केंद्रावर हल्ला केल्याची पुष्टी इस्रायलच्या सुत्रांनी केली आहे. नागरी भाग आणि लष्करी स्थानांवर हल्ला झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे. दरम्यान, इराणने सलग सहाव्या दिवशी इस्रायलवर क्षेपणास्त्र हल्ला केला त्यामध्ये तेल अवीव मोसाद कार्यालयाला लक्ष्य करण्यात आले. इस्रायल ने इराणवर केलेल्या हल्ल्यातील मृतांची संख्या 220 झाली असून त्यात 70 स्त्रिया आणि लहान मुलांचा समावेश आहे. तर इराणच्या हल्ल्यात 20 इस्रायल नागरिक ठार झाले आहेत.

**<u>ट्रम्प-इराण धमकी</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला बिनशर्त शरणागती पत्करण्याचा इशारा दिला आहे. समाज माध्यमांवरील संदेशातून ट्रम्प यांनी, इराणचे सर्वोच्च नेते अली खमेनी यांना पदच्युत करण्याची कारवाई न करता अमेरिका त्यांना जीवे मारू शकते मात्र सद्यस्थितीत अमेरिका अशा प्रकारची कारवाई टाळत असल्याचे म्हटले आहे. नागरिकांवर किंवा अमेरिकन सैनिकांवर क्षेपणास्त्रे डागायची नाहीत यासाठीच अमेरिका कोणतेही पाऊल उचलत नसल्याचे म्हटलं आहे. इराणला बिनशर्त आत्मसर्मपण करण्याचे आवाहन करून त्यांनी खमेनी कुठे लपले आहेत,  याची माहिती अमेरिकेला आहे, मात्र त्यांना मारण्याचा सध्या विचार नसल्याचे संदेशात म्हटले आहे. जी ७ परिषदेतून लवकर माघारी परतलेल्या ट्रम्प यांनी तेहरानमधील साडेनऊ दशलक्ष रहिवाशांना तेहरानमधून बाहेर पडण्याचे आवाहन केल्याच्या पार्श्वभूमीवर हे संदेश प्रसारीत केले आहेत.

**<u>श्रीलंका समुद्री अभ्यास</u>**

श्रीलंकेनं संयुक्त राष्ट्राच्या ध्वजांकित जहाजाला आपल्या जल क्षेत्रात समुद्री संशोधन करण्याविषयी परवानगी देण्यास विलंब केला आहे. परकीय वैज्ञानिक मोहिमांचे नियमन करण्याच्या मार्गदर्शक धोरणाचा अभाव असल्यानं ही परवानगी दिली नसल्याचं श्रीलंकेनं स्पष्ट केलं आहे. या विधानाची परराष्ट्र मंत्री विजिता हराथ यांनी पुष्टी केली असल्याचं स्थानिक माध्यमांनी

म्हटलं आहे. संबंधित जहाज सध्या मॉरिशसच्या समुद्रात थांबलं असून, 15 जुलै ते 20 ऑगस्ट या कालावधीत ते श्रीलंकन समुद्रात संशोधन सुरू करण्याची योजना आहे. श्रीलंकेचे शास्त्रज्ञही या संशोधनात सामील होण्याची शक्यता असली तरी अद्याप श्रीलंकन बोर्डानं परवानगी प्रलंबित ठेवली आहे.

**इंडोनेशिया ज्वालामुखी**

इंडोनेशियाच्या सर्वात सक्रिय ज्वालामुखींपैकी एका ज्वालामुखीचा काल उद्रेक झाला असून त्याचा लाव्हा 11 किलोमीटर पेक्षा जास्त उंच उसळत आहे. हा आत्तापर्यंतचा उच्चांक असल्याचं ज्वालामुखी शास्त्रीय संस्थेनं म्हटलं आहे. सुरुवातीला राखेचा मोठा ढीग आसमंतात फेकला गेला आणि त्यानंतर तो फ्लोरेस या पर्यटन बेटावर पसरला. या घटनेतील नुकसान आणि जीवित हानिविषयी अद्याप कोणतीही माहिती हाती आलेली नाही. या आधी नोव्हेंबर मध्ये ज्वालामुखीचा उद्रेक झाला होता ज्यामध्ये 9 नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आणि हजारो नागरिकांना स्थलांतरित व्हावं लागलं होतं.

**व्हिएतनाम पाऊस**

व्हिएतनामला वुटीप वादळाचा मोठा फटका बसला आहे. मुसळधार पावसाने आलेल्या पुरामुळे सात जणांचा मृत्यू झाला. शेती आणि मालमत्तेला वादळाचा मोठा फटका बसला आहे. डाईक व्यवस्थापन आणि नैसर्गिक आपत्ती प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, क्वांग बिन्ह प्रांतात चार आणि क्वांग ट्राय प्रांतात तीन जणांचा मृत्यू झाला आहे. तर 33 हजार हेक्टरहून अधिक भातशेतीचे आणि हजारो हेक्टरवरील जलशेतीचे नुकसान झाले आहे.

**तिरंदाजी आशिया कप**

तिरंदाजीच्या आशिया करंडक स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात, काल सिंगापूरमध्ये झालेल्या स्पर्धेत पुरूष आणि महिला वैयक्तिक स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडू अंतिम फेरीत पोचले. पुरूषांच्या वैयक्तिक स्पर्धे, कुशाल दलालने बांग्लादेशच्या हिमू बच्चरला मात दिली. तर महिलांच्या संयुक्त विभागात, भारताचे सुवर्ण आणि रौप्य पदक निश्चित झाले आहे. शानमुखी नागा साई बुद्दे आणि तेजल साळवे यांनी अंतिम फेरीत धडक मारली आहे.

**आसाम पाऊस**

भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानंतर गृहमंत्रालयाने आज आणि उद्या आसामला वादळासह अतिमुसळधार पावसाचा लाल बावटा दिला आहे. राज्य सरकारने सर्व सुरक्षा काळजी घ्यावी असे निर्देश गृहमंत्रालयाने दिले आहेत. राज्यात पावसाचा इशारा असला तरीही उकाडा आणि दमट वातावरण कायम राहाणार असून तापमान 38 अंश सेल्सिअस राहाणार असल्याचंही सांगण्यात आलं आहे. दरम्यान बिस्वनाथ आणि लखीमपूर जिल्ह्यातील 10 गावांना पुराचा वेढा कायम आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार